# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०१/२०२५ (मंगळवार) सायंकाळ**

---

### हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याचे उद्देशाने अस्तीत्व लपविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे नरखेडः— दिनांक २७/०१/२०२५ चे ०१.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी हे नाईट डयुटी दरम्यान पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता मौजा वडेगाव उमरी बस स्टॉप मंदीर जवळ ३ इसम अंधारामध्ये आपले अस्तीत्व लपवितांना मिळुन आले तिनही इसमांना थांबवुन त्याचे नाव गाव विचारले असता व इथे येण्याचा उददेश विचारला असता उडवा उडवीचे उत्तर देत होते. सदर तिन्ही ईसम **१) राजु पाचु धुर्वे रा गोंडि वडोला (म.प्र.) २) सुरेश मनुजी टेकाम ३) रामभाऊ राजेराम ईवनाती दोन्ही रा. वडेगाव उमरी ता. नरखेड** हे आपले अस्तीत्व लपवुन अंधाराचा फायदा घेवुन हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याच्या उददेशाने मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे नरखेड येथे आरोपीतांविरूद्ध कलम १२२ मपोका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर